PTVA Schools

# दर्पण

For private circulation only




PTVA Schools दर्पण completes 1 year!

(सविस्तर वृत्त पान 5)

VOLUME: 02 | ISSUE : 01 | 8 PAGES    January 2024

## संपादकीय

नमस्कार,

नवीन वर्षाच्या आरंभी गेल्या वर्षाकडे मागे वळून पाहिले तर पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या सर्व शाळांचे दर्पण हे वार्तापत्र सुरू करण्याचा संस्थाचालकांचा निर्णय यशस्वी झाला असे म्हणता येईल. 'दर्पण'ने एक वर्ष पूर्ण करून २६ जानेवारीला दुसऱ्या वर्षात पदार्पण केले. पाटिविअच्या सर्व शाळांचे यथार्थ प्रतिबिंब गेल्या वर्षभरात दर महिन्याच्या शेवटी दर्पण वार्तापत्राच्या अंकात पहायला मिळाले. शाळेतल्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये मिळवलेली बक्षिसे, शाळांमध्ये शिक्षक राबवत असलेले विविध कल्पक उपक्रम, माजी विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी याविषयी संपूर्ण माहिती देणारे दर्पण हे वार्तापत्र म्हणजे एका अर्थाने सर्व शाळांचे प्रगतिपुस्तकच आहे. दर महिन्याला अतिथी संपादक म्हणून एका शाळेच्या मुख्याध्यापकांनी लिहिलेल्या संदेशातून त्या त्या महिन्यातील वैशिष्ठ्यांविषयी दर्पणमध्ये आपल्याला वाचायला मिळाले. या शिवाय सुट्टी विशेषांक आणि बहारदार दिवाळी अंक आपण वाचला. या उपक्रमातून शाळेतील विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी, यातून प्रेरणा घेऊन विद्यार्थी लिहिते व्हावेत आणि त्यायोगे त्यांचा स्क्रीन टाइम कमी व्हावा असा आमचा प्रयत्न आहे. पाटिविअच्या सर्व शाळांमधील विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यामध्ये दर्पण या सामायिक व्यासपीठाद्वारे माहिती आणि कल्पनांची देवाण घेवाण होते, यातून एकत्वाची भावना वाढीस लागते. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात जे सुचवले आहे त्याला मूर्त स्वरूप देणारा हा उपक्रम आहे. पाटिविअच्या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना पाटिविअच्या सर्व शैक्षणिक संसाधनांचा, कौशल्य क्षमतांचा एकत्रित वापर करता येऊ शकतो. त्यायोगे विद्यार्थ्यांना कौशल्य विस्ताराच्या, विविध विषयांच्या ज्ञानार्जनाच्या आणि त्यातून सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासाच्या अधिक संधी उपलब्ध होत आहेत. विविध क्रीडा प्रकारांच्या प्रशिक्षणाची सुविधाही आपल्या पाटिविअच्या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना आपण देत आहोत. भविष्यातील गरजा ओळखून Artificial Intelligence (AI) अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयाचेही शिक्षण प्राथमिक वर्गापासूनच द्यायला आपण सुरूवात केली आहे. मला विश्वास आहे की यामुळेच पाटिविअ मधील विद्यार्थी येणाऱ्या स्पर्धात्मक युगात यशस्वी होतील. दर्पणच्या प्रथम वर्धापनदिनानिमित्त या उपक्रमांत सहभागी झालेले विद्यार्थी, शिक्षक, पालक यांचे हार्दिक अभिनंदन. दर्पणच्या माध्यमातून उत्तम आणि नेमका मजकूर देणाऱ्या दर्पणच्या संपादिका, देखणी मांडणी करून वेळेत आपल्यापर्यंत अंक पोहोचवणारे मुद्रक यांचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा.



दिलीप पेठे

दिलीप पेठे
कार्यवाह, पार्ले टिळक विद्यालय असोसिएशन

# प्रदर्शनातून उलगडली महासागराची अनोखी दुनिया






**पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनचे नवीन वर्ष नेहमीच उत्साहात आणि कार्यमग्नतेत सुरु होते. दरवर्षी जानेवारीच्या पहिल्या शनिवार आणि रविवारी पार्ले टिळक विद्यालय मराठी शाळेच्या प्रांगणात एखादा विषय ठरवून त्यावर आधारित भव्य प्रदर्शन भरवण्यात येते. पा टि वि अ च्या पाचही शाळांमधील शिक्षक आणि विद्यार्थी एकत्र येऊन एका विषयाची संपूर्ण माहिती देणारे प्रदर्शन भरवतात. यंदा या उपक्रमाचे पाचवे वर्ष होते. 'ओशन अर्थात महासागर' हा यावर्षीचा विषय होता. राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेच्या मुंबई विभागाच्या प्रमुख वैज्ञानिक डॉ. सोनिया सुकुमारन यांच्या हस्ते ६ जानेवरी २०२४ रोजी प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.**

यावेळी डॉ. सुकुमारन यांनी विद्यार्थ्यांना समुद्रविज्ञान अर्थात ओशनोग्राफी या विषयावर अत्यंत प्रेरणादायी माहिती दिली. तर दुसऱ्या दिवशी सांगता समारोहासाठी व्हाईस ॲडमिरल किशोर ठाकरे (निवृत्त) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी सलामी देवून पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी ॲडमिरल किशोर ठाकरे यांनी भारतीय नौदल याविषयी विस्तृत सादरीकरण केले. त्यांच्या माहितीपूर्ण सादरीकरणाचा लाभ विद्यार्थी, सर्व शिक्षक आणि प्रदर्शन पाहण्यासाठी आलेल्या पालक आणि नागरिकांनी घेतला. त्यानंतर पाहुण्यांनी प्रदर्शनातील सर्व कक्षांना भेट देवून विद्यार्थी आणि शिक्षकांचे कौतुक केले.

प्रदर्शनात वैशिष्ट्यपूर्ण मांडणीतून दर्शकांना जणू काही सागराच्या आतमध्ये शिरल्याचा आभास निर्माण करण्यात आला होता. विविध मॉडेल्सच्या साहाय्याने महासागरांची रचना, वैशिष्ट्ये, त्यातील जीवसृष्टी, जलमार्ग, व्यावसायिक उपयोग, नवीन संशोधन, समुद्रयान मिशन, करियरच्या संधी अशा सर्व बाजूंनी महासागर या विषयाची समग्र माहिती या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना मिळाली. पाटिविअच्या पाचही शाळांमधील विज्ञान, भूगोल आणि कला शिक्षकांनी हे प्रदर्शन उभारण्यासाठी मेहनत घेतली. शाळांमधील विद्यार्थी प्रदर्शनात सहभागी होउन अतिशय प्रभावीपणे दर्शकांना विषयाची माहिती विविध कल्पक पद्धतींनी देत होते. हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले होते. सुमारे दहा हजार लोकांनी प्रदर्शनाला भेट दिली.

एनसीसी पथकाने पाहुण्यांना मानवंदना दिली. त्यानंतर लेझीम पथकाने सुंदर फॉर्मेशन करत रॅलीला सुरूवात झाली. एका मागोमाग एक सर्व शाळांचे मुख्याध्यापक आपल्या शिक्षक व विद्यार्थ्यांच्या चमूसह रॅलीत सहभागी झाले. या कल्पक उपक्रमाची संकल्पना ज्यांची आहे ते संस्थेचे सहकार्यवाह हेमंत भाटवडेकर यांनी सर्वांचे आभार मानले. गेली पाच वर्षे भाटवडेकर सर स्वतः प्रदर्शनाचा विषय ठरवण्यापासून ते प्रदर्शनाच्या सांगतेपर्यंत प्रत्येक गोष्टीत सक्रिय सहभागी होतात. किंबहुना प्रदर्शनाच्या टीमचे ते "Non Playing Caption" आहेत असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

प्रदर्शन उभारणीत ज्यांचे मोलाचे सहकार्य लाभले ते डेकोरेटर्स, प्रिंटर्स, व्हिडिओ आणि साऊंड, इलेक्ट्रिसिटी, हाऊसकिपिंग, सेक्युरिटी आणि केटरर्स या सर्वांना यावेळी संस्थेचे अध्यक्ष अनिल गानू, कार्यवाह दिलीप पेठे, खजिनदार श्री. धुरंधर यांच्या हस्ते गौरवण्यात आले. राष्ट्रगीताने या दिमाखदार सोहळ्याची सांगता झाली.

**प्रदर्शनातील दालनांविषयी सविस्तर माहिती वाचा आतील पानावर.**

# शाळेचे माजी विद्यार्थी गणेश देवरुखकर द्रोणाचार्य पुरस्काराने सन्मानित

**शिष्येन विराजते शाला |**

भारतासाठी दिग्गज खेळाडू घडवणाऱ्या प्रशिक्षकांना १९८५ पासून प्रतिष्ठित द्रोणाचार्य पुरस्कार देण्यास सुरुवात झाली. प्रशिक्षकांना देण्यात येणारा हा भारताचा सर्वोच्च पुरस्कार आहे. धनुर्धारी शिष्याच्या पाठी उभे राहून त्याला मार्गदर्शन करणारे गुरु द्रोणाचार्य अशा स्वरूपाची ट्रॉफी, प्रमाणपत्र आणि १५ लाख रुपयेरोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. २०२३ या वर्षाकरिता घोषित केलेला द्रोणाचार्य पुरस्कार पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाचा माजी विद्यार्थी असलेले श्री. गणेश प्रभाकर देवरुखकर यांना प्राप्त झाला आहे.

मल्लखांब प्रशिक्षक गणेश देवरुखकर यांनी २०२३ यावर्षी भूतान येथे आयोजित केलेल्या विश्व मल्लखांब चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळवणारे अक्षय प्रकाश आणि जान्हवी सुरेश यांना प्रशिक्षित केले आहे. त्यांच्या प्रशिक्षण कार्याचा मान राखून द्रोणाचार्य पुरस्काराने त्यांना ९ जानेवारी २०२४ या दिवशी नवी दिल्ली येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते गौरविण्यात आले. पार्ले टिळक मराठी शाळेचा झेंडा अटकेपार फडकवणाऱ्या या यशवंत गुणवंत विद्यार्थ्याचा शालामाऊलीला सार्थ अभिमान आहे.

श्री. गणेश देवरुखकर यांच्याशी संवाद साधला आहे पार्ले टिळक विद्यालय मराठी शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थिनी कु.शर्विष्ठा घाडी आणि कु. गायत्री सावंत यांनी. ही मुलाखत पाहण्यासाठी सोबतचा QR CODE स्कॅन करा.



Scan here

## PTVA Schools celebrate 1st anniversary of दर्पण on Republic Day



PTV (ICSE)



PTV (ICSE)



PTVEMS (Secondary)

On the 75th Republic Day, PTVA Schools दर्पण celebrated its first anniversary. On this day, a year ago, the Management of PTVA initiated this thoughtful idea. दर्पण has completed its one successful year of communication, keeping us well-informed about the latest updates, achievements, and happenings of all the PTVA schools.

The Principal of PTV (ICSE), Dr (Mrs) Arnavaz Bhagat, felicitated the Cultural Heads, Mrs Rekha Anand and Mrs Arunima Dave, appreciating their efforts and contribution to the newsletter, which aims at not only inculcating reading habits among the students but also enhancing collaboration.

PTVEMS (Secondary) commemorated this milestone by felicitating its teacher, Mrs Vinitha Nair, for her contributions in providing content through effective coordination with the staff and students.

# पार्ले महोत्सवात परांजपे माध्यमिक विद्यालयाचा दणदणीत विजय





विलेपार्ले येथील वामन मंगेश दुभाषी मैदानावर मुंबईतील सर्वात मोठा महोत्सव म्हणून ओळखला जाणारा पार्ले महोत्सव मोठ्या दणक्यात साजरा झाला. गेली २३ वर्षे सातत्याने हा महोत्सव विलेपार्ले येथे आयोजित केला जातो. या महोत्सवातील आंतरशालेय कबड्डी स्पर्धेत परांजपे विद्यालयाच्या माध्यमिक विभागातील कबड्डी संघाने विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात परांजपे विद्यालयाने म्युनिसिपल दिक्षित रोड शाळेचा पराभव करून विजय संपादित केला. त्यानिमित्ताने शाळेला ट्रॉफी, खेळाडूंना प्रमाणपत्रे व रोख पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. परांजपे विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. हाक्के तसेच योगेश पुरव, हरीश फणसे यांनी या संघाच्या यशस्वीतेसाठी प्रचंड मेहनत घेतली होती.



शालेय जीवनातील मुलांच्या आनंदाच्या दिवसांपैकी एक दिवस म्हणजे सहल. अनेक दिवसांपासून विद्यार्थी सहलीची वाट पाहत असतात. यावर्षी पार्ले टिळक विद्यालय मराठी प्राथमिक शाळेच्या इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांची सहल मालाडला सायना रिसॉर्ट या ठिकाणी गेली होती. शिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थी शिस्तीने वागत होते. मुलांचा हा दिवस अविस्मरणीय ठरला.



## एनसीसी पथकाची गगनभरारी

पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाच्या माध्यमिक विभागाची शान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एनसीसी पथकाने आपल्या कारकिर्दीत आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. भारताच्या ७५ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत बांद्रा येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संचलनात मुंबईचे पालकमंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांना मानवंदना देणाऱ्या सलामीवीरांमध्ये पाटिविमच्या एनसीसी पथकाचे ३२ विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यालयाचे एनसीसी प्रमुख शिक्षक श्री.उमेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या या एनसीसी संघाने अत्यंत चमकदार कामगिरी करत ही बहुमानाची संधी पटकावली.

## शाळेत बालिका दिवस साजरा



ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती ३ जानेवारी या दिवशी संपूर्ण महाराष्ट्रात बालिका दिवस म्हणून साजरी केली जाते. परांजपे विद्यालय प्राथमिक शाळेत देखील ३ जानेवारी रोजी बालिका दिन साजरा करण्यात आला. या दिवशी शाळेतील विद्यार्थिनींचे औक्षण करून त्यांचा सन्मान केला. तसेच थोर समाजसेविका, शिक्षिका आणि कवयित्री सावित्रीबाई फुले यांची माहिती शाळेतील राऊळ बाईंनी मुलांना सांगितली. सावित्रीबाईंनी केलेले कार्य किती मोलाचे आहे हे सगळ्यांना समजावून सांगितले.

# प्रजासत्ताक दिन चिरायु होवो

पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाच्या प्राथमिक व माध्यमिक विभागात संयुक्तपणे प्रजासत्ताक दिन सोहळा संपन्न झाला. स्वतंत्र भारताचा ७५ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यासाठी दोन्ही विभागातील सर्व विद्यार्थी तसेच शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी मैदानावर उपस्थित होते. देशभक्तीपर गीतांच्या ध्वनिमुद्रिकांनी छान वातावरण निर्मिती केली होती.

सर्वप्रथम विद्यालयाची प्रार्थना घेण्यात आली. विद्यालयाच्या परंपरेनुसार प्रथम लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्यास व भारतमातेच्या प्रतिमेस प्रमुख पाहुण्या पार्ले टिळक विद्यालय, प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका श्रीम. हर्षदा चव्हाण यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी सर्व उपस्थितांना प्रजासत्ताक दिनाची प्रतिज्ञा उद्धृत केली. हर्षदा चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यावर ध्वजाला सलामी देत राष्ट्रगीताचे गायन झाले. त्यानंतर राज्य गीत



सादर केले गेले. प्रमुख पाहुण्यांनी प्रास्ताविक आणि प्रजासत्ताक दिनाची माहिती सांगितली. तद्नंतर प्राथमिकच्या मुख्याध्यापिका श्रीमती चव्हाण, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मुक्ता मिठे व प्राथमिक विभागाच्या जेष्ठ शिक्षिका श्रीमती. केळुस्कर यांच्या हस्ते प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या हस्तलिखित मासिकांचे प्रकाशन करण्यात आले. प्राथमिकच्या विद्यार्थ्यांनी गुच्छ कवायतीचे शानदार प्रदर्शन केले. समूहगीत स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त झालेल्या ४/३ या प्राथमिकच्या वर्गाने छान समूहगीत सादर केले. यानंतर माध्यमिक विभागाचीही दोन समूहगीते सादर झाली. त्यानंतर माध्यमिक विभागाचा बक्षीस वितरणाचा समारंभ पार पडला.

यावेळी दर्पण या संस्थेच्या मुखपत्राच्या वर्षपूर्तीनिमित्त शाळेतर्फे लेख तयार करून देणाऱ्या शिक्षिका श्रीमती. लता सूर्यवंशी यांचा सत्कार करण्यात आला. तसेच गेल्या वर्षभरातील सर्व अंक आणि त्यावरील विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया शाळेच्या दर्शनी भागात मांडण्यात आल्या.

# वार्षिकोत्सवातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे सादरीकरण

'विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा आनंदाचा सोहळा" म्हणजेच वार्षिकोत्सव. डिसेंबर महिना सुरू झाला की शाळेत वार्षिक उत्सवाची तयारी सुरू होते. यंदाचा पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक विभागाचा वार्षिकोत्सव मोठ्या उत्साहात आनंदात साजरा झाला. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी सिने अभिनेत्री श्रीमती अनुघा देव, पदाधिकारी श्री. जोग, संस्थेच्या समन्वयक श्रीमती. खांडेकर यांनी या सोहळ्याला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. मान्यवरांच्या हस्ते बक्षीस समारंभाचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमात खूप विविधता होती. वार्षिकोत्सवाचा सोहळा अतिशय आनंदात, उत्साहात पार पडला. या कार्यक्रमातील

मुलांच्या सादरीकरणाचे कौतुक करण्यासाठी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## कलाकारांचे नववर्ष



तावी गायकवाड, विद्यार्थिनी, पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक शाळा

**सिनेअभिनेता विक्रम गायकवाड**
**सिनेअभिनेत्री अक्षता विक्रम गायकवाड**

३१ डिसेंबर म्हणजे जुन्या वर्षाला टाटा बाय बाय करून नवीन वर्षाचे नव्या उत्साहात व जल्लोषात स्वागत. आम्ही १ जानेवारी रोजी सकाळी नववर्षाची सुरुवात सिंहगडावर जाऊन करायचे ठरवले. आता गडावर जायचे म्हणजे पहाटे लवकर निघावे लागणार, त्यामुळे ३१ डिसेंबर या वर्षाच्या शेवटच्या दिवशी रात्री सगळी दुनिया जागी असताना आम्ही मात्र वेळेत झोपलो. आणि नववर्षाच्या पहाटे चार वाजता उठून नवीन वर्षाच्या सगळ्यांना शुभेच्छा दिल्या. नंतर आम्ही सिंहगडावर गेलो. वेगळाच आनंद वाटत होता. इतकी छान नवीन वर्षाची सुरुवात याआधी कधी झाली नव्हती.

## दिलगिरी

डिसेंबर महिन्यातील दर्पण मासिकात पार्ले टिळक विद्यालय मराठी प्राथमिक विभागाचा मजकूर नजरचुकीने प्रसिद्ध करायचा राहून गेला. त्याबद्दल क्षमस्व.

- ठाणेवैभव टीम

## क्रीडा महोत्सव उत्साहात





दुसरे सत्र सुरू झाले की शाळेत स्पर्धा, उपक्रम यांची नांदीच असते. क्रीडा महोत्सवामुळे विद्यार्थ्यांच्या अंगी खिलाडू वृत्तीची वाढ होते. सर्व विद्यार्थी शिस्तीचे पालन करायला शिकतात. मैदानात त्यांच्या खिलाडू वृत्तीचा कस लागतो. पार्ले टिळक प्राथमिक विभागात क्रीडा महोत्सव मोठ्या दिमाखात पार पडला. पहिली ते चौथी मधून निवडलेल्या विद्यार्थ्यांची अंतिम स्पर्धा झाली. प्रत्येक इयत्तेतून पाच क्रमांक काढण्यात आले. क्रमांकानुसार मुकुट घालून विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले.



बृहन्मुंबई महानगरपालिका खाजगी अनुदानित शिक्षण विभागातर्फे आयोजित धावणे स्पर्धेत २२ शाळांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्तम यश संपादन केले. पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांमधून आठ विद्यार्थ्यांची निवड झाली होती. त्यामधील पाच विद्यार्थ्यांनी यश पटकावले व शाळेला मानाचे स्थान मिळवून दिले. इयत्ता चौथीतून मुलांमध्ये अर्णव निलेश गोरुले याने प्रथम क्रमांक, मुलींमध्ये स्वरा समीर मालपेकर हिने उत्तेजनार्थ तर इयत्ता तिसरीतून मुलींमध्ये पूर्ती प्रशांत रायकर, इयत्ता दुसरी मुलांमध्ये हार्दिक नरेश पडेल आणि मुलींमध्ये मनाली संदीप राणे या सर्वांनी उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला.

# बर्फाच्छादित स्वरूपातील आर्क्टिक महासागराचे रुप प्रदर्शनातून सादर...

पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनतर्फे आयोजित केलेल्या महासागर या विषयावरील प्रदर्शनात यावर्षी परांजपे विद्यालय प्राथमिक शाळेला आर्क्टिक महासागर आणि त्यातील जीवसृष्टी असा विषय दिला होता.

आर्क्टिक महासागराचे पृथ्वीच्या नकाशावरील स्थान, महासागरातील विविध प्राणी, पक्षी आणि त्यांची वैशिष्ट्ये या सगळ्यांचा समावेश प्रदर्शनात केला होता. आर्क्टिक महासागराचे हे अनोखे विश्व दृकश्राव्य स्वरूपात मांडले होते. विविध प्राण्यांचे आवाज या प्रदर्शनाच्या वेळेस ऐकायला मिळाले. प्रदर्शन मांडताना आर्क्टिक महासागराचे बर्फाच्छादित स्वरूप जसे आहे तसे प्रदर्शनाच्या जागी दाखवण्यासाठी प्रदर्शनाची जागा पांढऱ्या रंगाच्या कापडाने आणि खोट्या बर्फाने सजवली होती.

शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका सौ. प्रियांका बर्वे यांच्या नेतृत्वाखाली शाळेचे शिक्षक श्री. तुकाराम कोळी आणि शिक्षिका शीतल राऊळ, सौ. संजना यांनी प्रदर्शन मांडले. त्याचबरोबर इयत्ता तिसरी आणि चौथीच्या विद्यार्थ्यांनी देखील आर्क्टिक महासागराची छान माहिती आलेल्या पाहुण्यांना सांगितली.

अशाप्रकारे महासागरांची अनोखी दुनिया मुलांना अनुभवायला मिळाली.




Stall 04

प्रदर्शनाचे व्हिडिओ पाहण्यासाठी बाजूला दिलेला QR code स्कॅन करा

## व्यायाम महत्वाचा



दर शनिवारी सकाळच्या वेळेत पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक विभागातर्फे मैदानात इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांची सांघिक कवायत घेतली जाते. शिस्तबद्ध पद्धतीने शारीरिक हालचाल करणे, समूहाची शिस्त पाळणे या गोष्टी यातून साध्य होतात.

# सागरी वाहतुकीच्या मार्गांचा मागोवा प्रदर्शनातून सादर




Stall 03

प्रदर्शनाचे व्हिडिओ पाहण्यासाठी बाजूला दिलेला QR code स्कॅन करा

**चला शोधूया लाटांमधल्या वाटा**
**अथांग सागर, उधाण वारा,**
**सळसळत्या लाटा.**
**खुणावती क्षितिजाची दारे**
**अन् लाटांमधल्या वाटा.**

महासागरीय प्रदर्शनाच्या तिसऱ्या क्रमांकाच्या दालनात प्रवेश करताच प्रेक्षक आपोआप एका महाकाय जहाजाच्या दर्शनी भागात पोहोचले. लयबद्ध काव्यरचना व पाण्याचे हलके तुषार यांच्या वर्षावात अर्णव या प्रवासी बोटीवर सर्वांचे स्वागत करण्यात आले. पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाच्या माध्यमिक विभागाने सागरी मार्ग व सागरी वाहतुकीची साधने यांचा देखावा साकारला होता. सागरी वाहतुकीच्या मार्गांचा मागोवा घेत इसवी सनापूर्वीच्या साधनांपासून ते अद्ययावत, अत्याधुनिक साधनांची तसेच सागरी मार्गांचा शोध लावणाऱ्या दर्यावर्दींची माहिती ध्वनीचित्रफितीद्वारे दाखवण्यात आली.

या ध्वनीचित्रफितीसाठी श्रीम. अंजली पाटील, श्रीम. राजश्री जडियार, श्रीम. वंदना कुलकर्णी व श्री. दीपक पाटील या शिक्षकांनी काम पाहिले. सागरी मार्गांचा मागोवा घेत इसवीसनाच्या हजारो वर्षे मागे जाताना कोलंबस, अमेरिगो व्हेस्पूसी, बार्थोलोम्यू डायस, वास्को-द-गामा, फर्डीनंड मॅगेलॉन यांनी शोधलेल्या सागरी मार्गांचे जगाच्या नकाशातून विजेच्या रोषणाईने मार्गक्रमण दर्शवणारा अप्रतिम उठावाचा नकाशा विद्यालयाचे कलाशिक्षक श्री.गोकुळ वाघ यांनी तयार केला होता. शिडाच्या होड्या, प्रवासी जहाज, मालवाहू व तेलवाहू जहाज तसेच पाणबुडी यांच्या अत्यंत रेखीव व प्रमाणबद्ध प्रतिकृती विद्यालयाचे कलाशिक्षक श्री.नितीन वानखेडे यांनी साकारल्या होत्या. या दोन्ही कलाशिक्षकांच्या प्रयत्नांनी साकारलेला प्रवासी जहाजाचा डेक हा सर्व प्रेक्षकांचे प्रमुख आकर्षण ठरला. विद्यालयातील सर्व सामाजिक अभ्यास व विज्ञान विषयाच्या शिक्षकांनी या दालनाच्या निर्मितीसाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीम. मुक्ता मिठे व उपमुख्याध्यापिका श्रीम. ललिता माने व इतर अधिकारी वर्ग यांच्या मार्गदर्शनाखाली आपापल्या परीने योगदान दिले. लाटांमधल्या या वाटा शोधण्यासाठी दोन दिवस प्रेक्षकांनी या दालनाबाहेर बरीच गर्दी करून आपल्या पसंतीची पावती दिली.

# अभ्यासपूर्ण नयनरम्य देखाव्यातून 'महासागर' विषयावरील प्रदर्शन सादर



Stall 04

प्रदर्शनाचे व्हिडिओ पाहण्यासाठी बाजूला दिलेला QR code स्कॅन करा

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पार्ले टिळक विद्यालय असोसिएशन आयोजित 'महासागर' या विषयावर भव्य प्रदर्शन ६ आणि ७ जानेवारी रोजी पार पडले. पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक मराठी शाळेने 'हिंदी महासागरातील प्राणी आणि वनस्पती' या विषयावर अभ्यासपूर्ण नयनरम्य देखावा मांडला.

या देखाव्यात हिंदी महासागराचे स्थान, कन्याकुमारी हे ठिकाण दाखवले होते. या महासागराच्या किनाऱ्यावर खारफुटी वने दाखवून त्याचे महत्त्व स्पष्ट केले. या महासागरात शार्क, व्हेल, डॉल्फिन या महाकाय माशांचे दर्शन घडले. हे विशाल समुद्री जीव बघून प्रदर्शन पाहायला आलेले शालेय विद्यार्थी भलतेच खुश झाले. समुद्री साप, ब्लू रिंग्ड ऑक्टोपस, स्टारफिश, छोटे मोठे रंगीबेरंगी मासे यांनी तर देखाव्याला भलतीच शोभा आणली.

हिंदी महासागरातील प्राणी व वनस्पती यांची अन्नसाखळी, महासागरी व्यवस्थापन याविषयी सखोल माहिती साई गुरव, रुद्र सूर्यवंशी, अथर्व निंबाळकर, अवनी कलबाटे, स्वयम महाडिक, ओम सुर्वे, शुभ्रा झेपले, कृष्णाई घाडी, श्री कुष्टे, नील धुमाळे, देवांग गावडे, आर्या सोनार या विद्यार्थ्यांनी अत्यंत छान पद्धतीने समजावून सांगितली. या सर्व मुलांचे कौतुक प्रमुख पाहुणे किशोर ठाकरे यांनी केले.

# परांजपे विद्यालय माध्यमिक शाळेने सादर केले विश्व महासागरांचे

पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनतर्फे पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाच्या प्रांगणात "महासागर" या विषयावर एक भव्य प्रदर्शन भरवण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उगमस्त्रोत मानले जाणारे पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनचे कार्यवाह श्री. हेमंत भाटवडेकर यांनी या प्रदर्शनाचा विषय ठरवून त्या विषयाच्या पूर्ततेसाठी अथक प्रयत्न केले. त्यांच्या या कार्यात सन्माननीय जान्हवी खांडेकर यांनीही त्यांना भक्कम पाठिंबा दिला. या दोघांनीही या प्रदर्शनाच्या यशस्वितेकरिता सर्व गोष्टींचे अतिशय सुंदर असे नियोजन केले. तसेच प्रत्येक दालनातील संबंधित शिक्षकांना, मुख्याध्यापकांनाही त्यांनी वेळोवेळी अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या खंबीर पाठिंब्यामुळेच प्रत्येक शाळेने प्रदर्शनातील विषयाच्या सादरीकरणाचा हेतू साध्य केला.

परांजपे विद्यालय माध्यमिक शाळेने या प्रदर्शनात विश्व महासागरांचे हा विषय सादर केला होता. यात पृथ्वीच्या निर्मितीपासून पृथ्वीवर जलाशयांची व महासागरांची निर्मिती कशी झाली, हे कृतीयुक्त मॉडेल्सच्या साहाय्याने सादर केले. त्यानंतर महासागराखालील तळरचना, त्याचे विविध भाग तसेच पॅसिफिक महासागर, अटलांटिक महासागर, हिंदी महासागर, अंटार्क्टिक महासागर, आर्क्टिक महासागर या पाचही महासागरांचे थ्री डी मॉडेल्स साकारून प्रत्येक महासागरांची वैशिष्ट्ये, क्षेत्रफळ, घनता, खोली, त्यातील प्रमुख बंदरे, बेटे, किनाऱ्यावरील प्रसिद्ध शहरे इ. माहिती प्रदर्शित करण्यात आली होती. महासागरी आपत्ती चक्रीवादळे, त्सुनामी,






महासागरी हालचाल, सागरी लाटा, भरती, ओहोटी, त्यांचे प्रकार या साऱ्यांचेही कृतीयुक्त मॉडेल यावेळी साकारले होते. महासागरांचे मानवाला होणारे फायदे व प्रदूषणाची कारणे मॉडेल्सच्या आधाराने समजावून देऊन महासागरांचे संरक्षण करणे मानवासाठी अत्यावश्यक आहे हा पर्यावरणीय दृष्टिकोन सांगितला गेला.

महासागरी सफरी करणाऱ्यांचा भरवशाचा साथीदार असणारा दीपस्तंभ थ्री डी मॉडेलमध्ये साकारून फिरत्या प्रकाश योजनेद्वारे वातावरण निर्मिती करण्यात आली होती. समुद्र सफरी करणाऱ्या अनेक मालवाहू जहाजांचे, युद्धनौकांचेही थ्री डी मॉडेल साकारले होते. या दालनातील वैशिष्ट्य म्हणजे पाणबुडीची प्रतिकृती व दीपस्तंभाची प्रतिकृती हे या प्रदर्शनातील विशेष आकर्षण ठरले. यातील काही माहिती दृकश्राव्य माध्यमातून प्रदर्शित करण्यात आली होती. अशा प्रकारे या दालनाच्या माध्यमाने महासागरांचे समग्र विश्व साकारण्यात आले होते. परांजपे विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. हाक्के यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीम. ऋतुजा शिर्के, पूर्णांक शिर्के, श्री. श्रीधर पिंगळे आणि विद्यार्थी यांच्या संमिश्र परिश्रमाने या दालनाचे सादरीकरण करण्यात आले.

Stall 01

**प्रदर्शनाचे व्हिडिओ पाहण्यासाठी बाजूला दिलेला QR code स्कॅन करा**

# Transforming plastic waste for a sustainable future

The students of the Sanjeevani Club of PTV (ICSE), under the guidance of the team of Globalcity Farmer - Mrs Kaumudi Titus Passanha, Mr Titus Passanha along with Mrs Preeti Iswalkar (Teacher) - completed the 'Waste Segregation' activity. PTV (ICSE) is one of the few schools in Vile Parle actively involved in recycling plastic. "PTV ICSE School is handling such amazing initiatives under the support of their visionary Principal, Dr (Mrs) Anavaz Bhagat," said Mrs Kaumudi Passanha.

The students collected a huge volume of plastics from home and brought them to school, which was then segregated, packed and handed over to Project Mumbai for recycling. Project Mumbai recycles plastic waste and creates useful items from it.

The Sanjeevani Club of Parle Tilak Vidyalaya (ICSE) aims to motivate students to be conscious and responsible citizens and contribute to environmental protection through the different activities planned by the club.



# Brushes of Benevolence



The PTV (ICSE) students participated in the annual Sanskriti Art Exhibition from January 9 to 15 at Kohinoor Art Gallery, Andheri. All the paintings made by the students were priced at ₹2,000. Upon sale, half the amount was given to the budding artists and half to the school for donation to any NGO of their choice.

The collaboration with AkshayaShakti underscores the commitment to addressing crucial social issues, making the Sanskriti Art Exhibition a celebration of artistic diversity and a testament to the transformative power of collective goodwill.

The inaugural function was graced by Mr Sundeep Prabhakar and Dr Tejaswini Prabhakar (Founders of the Sanskriti Arts), Dr Narayan AB Iyer (CEO- AkshayaShakti Welfare Association). The school Principal, Dr (Mrs) Arnavaz Bhagat, expressed her gratitude to Sanskriti Arts for encouraging aspiring artists and inculcating a feeling of philanthropy in every participant. Through this harmonious fusion of art and altruism, the school fosters a sense of social responsibility among its students, teaching them the profound impact of creativity in promoting positive change.

# Roll the Imagination Dice to unlock the Magic of Words



PTV ICSE's December Book Club Activity for grades 6 to 8 transformed traditional short story writing into an exciting, collaborative experience. The innovative Imagination Dice replaced numbers with carefully chosen words and objects on each face, introducing a playful twist to the writing process. Students rolled the dice to uncover unique combinations, forming the foundation for creative expression. This group activity fostered collaboration and imagination as teams crafted poems, songs, and short stories, refining writing skills and exploring character development, grammar, and plot construction.

# Let's time-travel to the Iron Age

The Social Studies Culmination programme, themed around the Iron Age, unfolded in the school's second-floor hall with Grade V students of PTV (ICSE) taking centre stage.

The introductory session set the tone by exploring the significance of the Iron Age, highlighting its transformative impact on early societies globally. The subsequent skit delved into primitive smelting methodologies, emphasising their role in technological development. Students showcased the emergence of new trends during the Iron Age, including settlements with permanent structures, advancements in metallurgy, and the evolution of various crafts. The programme aimed to illustrate how these developments reshaped sociocultural and economic landscapes.





A lively quiz and Q&A session followed, fostering an interactive understanding of the Iron Age among students. The event then transitioned to a captivating poem-recitation, where students eloquently presented the essence of the Iron Age and its global influence.

# PTV(ICSE) students shortlisted from 19,000 Project entries across India

VIVO Ignite Technology and Innovative Awards is a collaborative initiative of VIVO, NCERT and iHUBdivyaSampark - IIT Roorkee. The theme of the year - 'Tech for Good Technology and Innovation for Social Impact,' was given to schools across India where students from Grades 6 to 9 could showcase their innovative ideas.

The first phase was held from November 3, 2023, to January 3, 2024. Among the 19,000 Project entries across the nation, Arya Gupte, Sharva Bhave and Aditya Jadhav of Grade 9 from PTV (ICSE) were shortlisted in the top 200, who displayed their working model titled 'Ingenious Drainage System' for the next phase held between January 10 and 24. Out of these 200 participants, only 10 will advance to the National Finals, which will be from February 6 to 9.



Arya Gupte | Sharva Bhave | Aditya Jadhav



The Library of PTV (ICSE) buzzed with intellectual fervour as students of grade 7 immersed themselves in the task of crafting essays on 'Great Freedom Fighters' and 'Leaders of India.' The students were encouraged to delve into a curated collection of books, essays, and historical documents highlighting India's journey towards becoming a sovereign republic.

# Observing Balika Din on the birth anniversary of Savitribai Phule



PTVEMS (Primary) celebrated Balika Din - the birth anniversary of Savitribai Phule, on January 3.

The programme started with a talk on Savitribai Phule by Urmila Bhende, a teacher, to enlighten the students about her work. The school's Headmistress, Mrs Kalpana Kalekar, and Supervisor, Mrs Sunita Bhagwat, garlanded the photo frame of Savitribai Phule. The students joined their hands to pay their respects to Phule. They also made sketches, posters, and slogans, which were displayed on display boards and inside the classrooms.

Towards the end, students pledged to uphold the values she stood for and continue her work towards a more egalitarian society.

**Urmila Bhende, Class Teacher of IV A, PTVEMS**

# English, General Knowledge…they know it all!

Science Olympiad Foundation (SOF) conducted International English Olympiad (IEO) and International General Knowledge Olympiad (IGKO) exams in which the students of PTVEMS (Primary) earned gold medals for their excellence and participation certificates.



Winners of IEO: Avaneesh Gokhale (II B), Spandan Maskar (II C), Vedant Mulye (II C), Tejasvi Oke (III D), Lucas Kinny (IV B), Avyukta Sarmalkar (IV D), Shaurya Wategaonkar (IV C), and Pakhi Chauhan (IV B).

Winners of IGKO: Ayaan Jambhawadekar (II C), Nevaan Naik (II B), Spandan Maskar (II B), Hardik Harmalkar (II D), Anaya Pawar (III C), Devesh Baing (IV B), Avyukta Sarmalkar (IV D), and Gargi Bhosale (IV B)





IMAS INDIA ABACUS Visual competition 2023 conducted the competition 'Speed Up the Beads' on December 17, 2023 at World Trade Centre - Cuffe Parade, Mumbai, in which the participants had to solve 200 sums in eight minutes. In this competition, 1500 IMAS INDIAN registered students participated across different cities and countries in the presence of 223 IMAS INDIA Abacus Teachers. In this competition (C-1 category), Anvay Hase (II A) of PTVEMS (Primary) won the Flyers Grand Champion Offline and Online Junior Grand Champion awards. Urvi Hatpale (II A) and Hardik Harmalkar (II D), also from PTVEMS (Primary) secured merit awards.

Prathmesh Chavan (II B) from PTVEMS (Primary) won the third prize and National Scholarship Award (under category 3) at the 13th National Talent Search Drawing & Painting Scholarship Competition themed 'PAINT YOUR DREAMS' conducted by the Kid's Cerebral Academy. He earned a merit certificate, memento, bronze medal, and a cheque of ₹2000. In the same competition, Swati Mohite (IV C) bagged the sixth prize (under category 4) and won a merit certificate, memento and a bronze medal. Besides, 65 students received consolation prizes.



## Arya Paste dives into a pool of medals



Aarya Paste from PTVEMS (Secondary) showcased a remarkable performance at the 43rd Bombay YMCA Inter-School Swimming Championship in the Girls U11 category on January 7.

She won a silver medal in the 50m Freestyle with an impressive time of 34.56 seconds and clinched a bronze medal in the 50m Butterfly event, finishing at 39.97 seconds.

# PTVA Schools दर्पण completes 1 year!

Darpan is a complete newsletter covering all the aspects of schooling and beyond. The content is kept crisp and to the point, which makes it a great read. Photos and pictures add to the readability, making it mesmerising and memorable. The quality of the paper matters, too, adding to the shelf life of the newsletter. Darpan creates awareness about activities undertaken by PTVA schools and their students in academics, sports, wellness, culture, science and technology, arts, history and current affairs. It allows students to pen their creative thoughts and ideas, which get published in the newsletter. Reading about their friends in the newsletter inspires students. It fosters a culture of growth, creativity, and transformation in children's minds. Both children and their parents look forward each month to a brand new Darpan for inspiration and awareness. A small section can be included in the newsletter to bring awareness about forthcoming events. Children and parents can plan their work and engage in a better way.

**Hema Naik,** mother of Neevan (II B), PTVEMS

As we celebrate the first birthday of our PTVA's Darpan, let us know why it has become one of the favourites of our dearest students. They eagerly wait for Darpan's distribution at the end of every month. As soon as they have it in their hands, they flip the pages, and their eyes twinkle with joy. Their joy knows no bounds when they see their classmates, teachers, and colourful pictures in the newsletter. They also learn about the exciting events held in the other PTVA schools.

**Devangi Wadke,** Class Teacher of II A, PTVEMS



In the Geeta Chanting Competition organised by Chinmaya Mission, Avaneesh Oak (III D) of PTVEMS (Primary) clinched the second prize. Kiyansh Chiital (III B) and Ovie Pawar (III B) secured the consolation prizes.



**Makar Sankranti celebrations at PTVEMS (Primary).**

# Anoushka Patil ranks 5th in All-Round Gymnastics in India



In a spectacular display of talent, Anoushka Patil, a student of PTVEMS (Secondary), secured the top spot in the floor exercise category at the Junior Artistic Gymnastics National Championship held in Bhubaneshwar, Odisha, in the last week of December 2023. Her exceptional performance not only earned her first place in the floor exercise but also placed her at an impressive fifth position in the All-Round Championship for gymnastics in India.




The students of PTVA's English Medium School, Andheri excelled at the IMAS-ABACUS Offline Visual and Online Visual Competitions held on December 17. Shlok Karande secured the second runner-up position in C2, and Manasvi Bansode, Swaraj Jadhav, and Tanisi Kapoor received the MERIT award in A2, C2, and GRAND 2 respectively.

# Kabaddi, Kabaddi, Kabaddi...



On December 30, PTVA's EMS, Andheri Girls, lifted the Runner-Up Trophy at Parle Mahotsav 2023 in the Junior School Girls category. They also won a cash prize of ₹500. Trisha Lambe, Ditya Gupta, Avanee Soman, Tanisha Surve, Rashi Bhorade, and Pranjal Girkar formed the part of the winning team that coach Shri Prashant Bhagat trained.

# Exploring the Wonders of the World on Geography Day







PTVA's EMS, Andheri, observed Geography Day with zeal and enthusiasm on January 13 and 16.

The programme began with a speech given by Mrs Pratiksha Parshekar, Asst. teacher at the school. Students of Grade 6 prepared beautiful wall hangings with geographical features. The viewers appreciated these unique designs showcased in the display gallery well.

For Grade 7, an inter-house Geography Quiz competition based on 'Wonders of the World in Geography' was organised. It was an enriching experience for the students, making their Geography learning more exciting and engaging.

Through these activities, students could appreciate the geographical wonders and cultivate a sense of curiosity about them. They also understood the importance of diverse landscapes, cultures, and environments that make the planet unique.

**- Pratiksha Parshekar, Asst. Teacher at PTVA's EMS, Andheri**

# PTVA's EMS, Andheri, pays tribute to Rajmata Jijau and Swami Vivekananda





**"स्वराज्याचा जिने घडविला विधाता,**
**धन्य ती स्वराज्याची जननी...जिजामाता"**
**"जितना बडा संघर्ष होगा,**
**जीत उतनीही शानदार होगी।"**

The school hall of PTVA's English Medium School, Andheri, echoed with such catchy slogans as they paid a respectful tribute to Rajmata Jijau and also celebrated the Youth Day on January 12 on the birth anniversaries of Rajmata Jijau and Swami Vivekanand.

The programme began by offering a floral tribute to Rajmata Jijau and Swami Vivekanand followed by a variety of activities including speeches of the teachers, a melodious song **'आम्ही जिजाऊच्या लेकी'** sung by standard four students: Arpita Mahanti, Nidhi Khamkar and Trisha Lambe, inspiring stories by Avani Soman (VII), Pinak Patwardhan (VII), and Sarthak Kulapkar (IV), role plays by Mihika Supal (II) as Rajmata, Swaraj Jadhav (V) and Suyog Bhagat (VII) as Swami Vivekananda and his spiritual Guru Ramkrishna Paramhansa respectively and slogan writing by the students of standard four who were guided by the teachers Harshada Mulmule, Pinky Kapoor and Kaavya Rane.




Shaurya Lad (V D) from PTVEMS (Secondary) earned silver medals in the Vaulting Table and Team (Mumbai Sub) Event at the 57th State Artistic Gymnastics Sub-Junior Group Championship organised by the Maharashtra Amateur Gymnastics Association, affiliated with the Maharashtra Olympic Association and the Gymnastics Federation of India. It was held at Dervan, Chiplun, on December 25 and 26, 2023.

## Shreyan Gaonkar hits the right note

Shreyan Gaonkar (VII D) from PTVEMS (Secondary) secured third place at the zonal-level instrumental music competition organised by the Education Officer of the Greater Mumbai Western Region and the Secondary & Higher Secondary School Western Region. Shreyan played the instrument Pakhavaj in this competition held at Purushottam High School, Bandra. He received the prize from Mr Deepak Sawant, former Minister of Public Health of Maharashtra at Children Welfare School in Andheri.



# Devashree Bane dazzles at the 57th Artistic Gymnastics Competition

Devashree Bane (IV), a student of PTVA's EMS, Andheri, won several awards at the State Championship in the 57th Artistic Gymnastics Competition, held at Devran (Chiplun) on December 25 and 26, 2023, in the U10 Women's category. This competition saw participation from athletes across Maharashtra. The Maharashtra Amateur Gymnastics Association and the Gymnastics Federation of India organised it.

Devashree bagged the all-round championship with the coveted first position in Balancing Beam. She also secured second and third place in Team Event and Vault.



# PTV (ICSE) explores Ocean Currents and the Symphony of the Seas



At the 'Ocean Exhibition' hosted by PTVA on January 6 and 7, PTV (ICSE) showcased diverse exhibits unravelling key facets of oceanography. Each display offered insightful perspectives, from the dynamics of different Ocean Currents to the challenges posed by icebergs on trade routes. The exhibition delved into the Coriolis force, explaining its role in shaping global atmospheric and oceanic circulation. Highlighting the environmental urgency, the Gyres exhibit shed light on the Pacific Ocean's largest Garbage Patch. Insights into El Niño's climatic effects and a captivating "Whispers of the Deep" display rounded out the comprehensive showcase. The school's splendid effort successfully educated visitors on the wonders and challenges of the oceans, fostering awareness about the critical need for marine conservation.

**Scan the QR code to watch the video of the exhibition**

Stall 02

# मानवी मनोरे, पोवाडा, झेंडा कवायत सादरीकरण



परांजपे विद्यालयाच्या पटांगणावर भारताचा ७५ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. परांजपे विद्यालय माध्यमिक विभाग व प्राथमिक विभाग तसेच PTVA'S इंग्रजी माध्यम यांनी एकत्र येऊन हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा केला.

पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनचे पदाधिकारी श्री. प्रमोद लेले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शालेय प्रार्थनेनंतर संस्थेचे पदाधिकारी श्री. लेले सरांच्या हस्ते सर्वप्रथम भारतमातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. पर्यवेक्षिका श्रीम. लाड यांनी विद्यार्थांना प्रतिज्ञा सांगितली. ध्वजवंदना दिल्यानंतर प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून केलेल्या भाषणात विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी दिव्य स्वप्न पहावीत व त्याच्या पूर्ततेसाठी कठोर परिश्रम, कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा हे गुण अंगिकारावेत, पालकांच्या आज्ञेचे पालन करून यश शिखराकडे मार्गक्रमण करण्यास सांगितले. त्यानंतर माध्यमिक व प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी सुमधुर आवाजात विविध समूहगीते सादर केली. या समूहगीतांना श्रीम.भाग्यश्री बर्वे व कु.शीतल राऊळ यांनी मार्गदर्शन केले होते. परांजपे विद्यालय प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी "जे देशासाठी लढले ते अमर हुतात्मे झाले" हे देशभक्तीपर गीत सादर केले. इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी जोशपूर्ण पोवाडा व पटका सादर करून सुंदर वातावरण निर्मिती केली. या पोवाड्याला इंग्रजी विभागाच्या संगीत शिक्षिका श्रीम.काव्या राणे यांनी मार्गदर्शन केले होते.

यानंतर माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध संचलन सादर करून मानवंदना दिली. प्राथमिक विभागाच्या तिसरी आणि चौथीच्या विद्यार्थ्यांनी आकर्षक मानवी मनोरे रचून कार्यक्रमाची शोभा वाढवली. परांजपे विद्यालय माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी झेंडा कवायत तसेच लेझीम नृत्य सादर केले. मुख्याध्यापक श्री. हाक्के सर यांनी याला मार्गदर्शन केले होते. त्यानंतर देशभक्तीपर गीतावर लेझीम नृत्य सादर केले गेले. श्री. योगेश पुरव व श्री. हरीश फणसे यांनी त्यासाठी मार्गदर्शन केले होते.

परांजपे विद्यालय माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. हाक्के यांना 'महात्मा ज्योतिबा फुले' मुख्याध्यापक पुरस्कार मिळाल्याबद्दल PTVA'S इंग्रजी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम. मृणालिनी मेहत्रे यांनी अध्यक्षांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचे कौतुक केले. २६ जानेवारी २०२३ रोजी विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या दर्पण मासिकाला यशस्वीरित्या एक वर्ष पूर्ण झाल्याबद्दल त्यात कार्यरत असणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच विविध स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचेही कौतुक करण्यात आले.

# PTVA's EMS, Andheri, offers a sneak-peek into the Marine Life of Atlantic Ocean



PTVA's EMS, Andheri exhibited the Marine Life of Atlantic Ocean during the Ocean Exhibition of all PTVA schools.

The school showcased the marine plants and animals as per the depth wise zones, starting with the uppermost Sunlight Zone up to the depth of 200m from the ocean surface which offers suitable habitat for plant growth due to abundant sunlight and also, supports animal life to a great extent. Going deeper into the Twilight, Midnight, Abyssal and the last Trench Zone, the conditions don't support life due to complete darkness, freezing temperatures and crushing water pressure. These zones were well differentiated in the stall along with zone wise marine flora and fauna which included handmade models of plants like Kelp, Sargassum, Soft Corals, Coontails, Sea grass and animals like Sperm Whales, Purple Spined Sea Urchins, Sea Turtles, Eels, Angler Fish, Manta Rays, Swordfish, etc.

The well organised display was equally well explained by the students and was highly appreciated by the visitors.

Stall 04

**Scan the QR code to watch the video of the exhibition**

# *PTVEMS (Primary) gives a soul-soothing experience of the Pacific Ocean's Marine Life*




PTVEMS (Primary) provided a soulful experience to the visitors by displaying the Marine Life (Animals) of the Pacific Ocean during the PTVA schools' annual exhibition, the theme for which was 'Ocean.'

The school was allocated Stall 4, which comprised models of fishes like the Whale, Shark, Electric StingRay, and Perch, found in the Pacific Ocean. They were made to resemble their actual size and structure in the sea. The stall's highlight was the whale fish's tail and fin movement, which surprised the visitors.

The sound of the various fishes' cries also added to the stall's effect, making it an audio-visual treat for the visitors. Informative charts and flex boards gave an in-depth insight into marine life, and 12 students from grades 3 and 4 were appointed at the stall to share special facts about these fishes.

The stall models were prepared using paper pulp, keeping in mind the conscious thought of care and concern towards the environment, where the models, after dismantling and discarding, will be further recycled and reused in such projects in future.

**Devangi Wadke,**
**Class Teacher of IIA, PTVEMS**

# PTVEMS (Secondary)'s Aqua Escape and Oceanography win hearts



PTVEMS (Secondary) had put up two stalls, Stall 5 and Stall 6, at the Ocean Exhibition of the PTVA schools.

The exhibits in Stall 5, 'Aqua Escape: Your Passport to Tranquil Adventures,' presented how oceans play a pivotal role in global tourism, contributing significantly to the world economy. The presentation emphasised promoting sustainable tourism practices, highlighting the importance of preserving our oceans.

The school's Stall 6 featured two more informative exhibits. The first: 'Avenues of the Blue World', shed light on diverse career opportunities in Oceanography, inspiring young minds to explore professions related to the vast blue expanse. The second exhibit, titled 'The Power of the Waves - Harnessing Tidal Energy for a Sustainable Future', delved into the potential of tidal energy as a renewable resource, providing visitors with an educational and enriching experience.

Stall 05

Stall 06

**Scan the QR code to watch the video of the exhibition**

# PTVA schools swell with national pride on Republic Day




PTVEMS (Secondary)




PTVEMS (Primary)



PTV (ICSE) Primary

India's 75th Republic Day was celebrated with fervour on January 26 by all the PTVA schools.

PTV (ICSE) Primary Section commemorated the day with a grand Mass Assembly that commenced with the Principal's address. It was followed by a grand cultural programme featuring a Marathi speech, a vibrant dance performance, a Hindi poem recitation, and a patriotic song, fostering a sense of national pride among the attendees. Later, prizes were presented to the winners of the Geeta Chanting Competition and the Asset Second Level Gold Scholars.




PTV (ICSE) Secondary

The Secondary Section of PTV (ICSE) celebrations started with unfurling the national flag, followed by the national anthem and reciting of the Preamble. After the Principal's speech, there was a soulful poem recitation in Hindi, a thought-provoking speech in English, a mesmerising group song in Marathi by the school's choir group, and a vibrant group dance.

PTVEMS (Primary) observed this day on the school playground. The programme began with unfurling the national flag and singing the national anthem. The students sang an inspiring patriotic song. Ms Olivia Falcao (Class Teacher of IV B) delivered a speech on this special occasion. An elocution competition was held on the eve of Republic Day, and the students eagerly awaited its result with excitement. The winners were awarded with certificates and prizes. The programme concluded with the distribution of sweets, and students returned home with fond memories of that day.

At PTVEMS (Secondary), the national flag was respectfully saluted to mark the event, followed by a national anthem rendition. There was a March Past by the students of standard IX, a riveting lezim performance, rendition of the song, "जननी जन्मभूमि स्वर्ग से महान है, ये तन है मन है और प्राण है ॥", and inter-house singing competition. Mrs Vinitha Nair, the teacher, delivered an insightful speech, while Vanshika Jain (IX A) gave a speech in Hindi. Prizes were also presented to the winners of the individual and group singing competitions.

## कोपरा आमच्या मनोगतांचा...




आम्हा विद्यार्थ्यांसाठी दर्पण मासिकात एक स्वतंत्र कोपरा दिला जाणार आहे याचा मला खूप आनंद झाला. त्यामुळे माझ्या कलागुणांना वाव मिळणार आहे. तसेच आपल्या संस्थेतील सर्व मुले मला ओळखू शकतील. इतर मुलांमधील वेगवेगळे, त्यांच्यातील कलागुण कळतील. त्यामुळे मलाही नवनवीन गोष्टी करण्याची प्रेरणा मिळेल.

**- साई संदीप गुरव**
**इयत्ता ४ थी**

## Sudoku: EDUCATION


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | A | | I | E |
| | | | | | E | | | |
| I | A | E | C | O | D | | | |
| E | N | | D | | U | I | | |
| | | D | | E | | | | A |
| | | T | | | | E | | |
| T | | U | | D | C | | | |
| | | | U | A | | D | | |
| | D | C | | | | U | | O |

## ओळखा मराठी महिने





### मराठी कोडी

सात अक्षरी जिल्हा महाराष्ट्रात
ना असे काना नावात
ना असे मात्रा नावात
ना असे नी वेलांटी नावात
नाव सांगा त्याचे ?



ईश्वरी सुनिल जडियार, इयत्ता ६ वी




स्वरा किरण आडाव, इ. ७ वी



इशा दीपक पटलेकर, इ. ७ वी



दुर्वा रांगणेकर, इ. ७ वी

**विद्यार्थ्यांकडून मागवण्यात येणारा मजकूर दर्पण मासिकातून प्रसिद्ध करण्यात येत असून विद्यार्थ्यांच्या या स्तंभासाठी योग्य शीर्षक सुचवावे.**

Editor : Mrs Janhavi Khandekar | Supported by Thanevaibhav and KYT Team